# प्रेसनोट

दि. १९/०३/२०२५

ॲन्टी करप्शनच्या पुणे घटकाकडून नगरपरिषद, बारामती, जि. पुणे येथील नगर रचनाकार (Town Planner) यांना लाच मागणी व लाच स्विकारले प्रकरणी ताब्यात घेतलेबाबत.

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | बारामती शहर पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ अन्वये |
| तक्रारदार | पुरुष, वय ४५ वर्ष |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | श्री. विकास किसनराव ढेकळे, वय ५० वर्ष, पद - नगर रचनाकार (Town Planner) नगरपरिषद, ता. बारामती, जि. पुणे. (वर्ग-१, गट अ) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | २,००,०००/- (दोन लाख) रुपये |
| पडताळणी दरम्यान तडजोडीअंती लाच मागणी रक्कम | १,७५,०००/- (एक लाख पंच्याहत्तर हजार) रुपये |
| स्वीकारलेली लाच रक्कम | पहिला हप्ता १,००,०००/- (एक लाख) रुपये |
| पडताळणी दिनांक | १९/०३/२०२५ |
| सापळा दिनांक | १९/०३/२०२५ रोजी |
| ठिकाण | ऑक्सीजन जिम, ता. बारामती, जि. पुणे |
| तपास अधिकारी यांचे नाव व पद | श्री. अमोल भोसले, पोलीस निरीक्षक, लाप्रवि, पुणे (मो.क्र. ९५२७३१७५२७) |

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार हे बांधकाम व्यावसायिक आहेत. त्यांची एक फर्म असून त्यांचे (रुई) बारामती येथे निर्मीत विहार इमारत बी विंग १ या गृह प्रकल्पाचा प्रस्ताव नगरपरिषद - बारामती येथे दाखल केलेला होता. सदरचा प्रस्ताव मंजूर करण्याकरीता लोकसेवक विकास ढेकळे, नगर रचनाकार यांनी तक्रारदाराकडे २,००,००० (दोन लाख) रुपयाच्या लाचेची मागणी केल्याबाबतची तक्रार दि. १८/०३/२०२५ रोजी तक्रारदार यांनी ला.प्र.वि. पुणे येथे केली होती.

प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने दि. १९/०३/२०२५ रोजी लोकसेवक विकास ढेकळे, नगर रचनाकार यांचेकडे पंचासमक्ष पडताळणी केली असता, त्यांनी तक्रारदाराकडे वरील नमुद काम करण्यासाठी २,००,००० रुपयाची लाच मागणी करुन, तडजोडीअंती १,७५,००० रुपयाची लाच मागणी केल्याचे निष्पन्न झाले. लोकसेवक विकास ढेकळे यांनी मागितलेल्या लाच रक्कमेपैकी पहिला हप्ता म्हणून तक्रारदाराकडून १,००,००० (एक लाख) रुपये ऑक्सीजन जिम, बारामती येथे पंचासमक्ष स्विकारली असता त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले असून, त्यांचेविरुद्ध बारामती शहर पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ अन्वये गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कारवाई पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. शिरीष सरदेशपांडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, पुणे व अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१) ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
२) व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
३) ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
४) वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
५) ऑनलाईन ॲप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

19/03/25

(दयानंद गावडे)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक, (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.

सहायक पो. आयुक्त/पोलीस उप-अधिक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो
सत्यमेव जयते

Scanned with CamScanner